पुण्य नगरी

# सोलापूर विद्यापीठाच्या सायबर क्लबला मिळाला उत्कृष्ट पुरस्कार

**सोलापूर : प्रतिनिधी**

क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने आयोजित केलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा समारंभात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सायबर क्लबला राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन् यांच्या हस्ते 'बेस्ट क्लब ओव्हरऑल' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच एमसीएची विद्यार्थिनी सुप्रिया शिंदे यांना बेस्ट मिडिया डायरेक्टर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, डॉ.राजीवकुमार मेंते, मालती जाधव, सायली शेळके, सुप्रिया शिंदे, शकुंतला बेळ्ळे, अनुपमा काटकर, डॉ.कैलाश काटकर, डॉ.संजय काटकर, विशाल सालवी उपस्थित होते.

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रम अंतर्गत संगणकशास्त्र संकुलाच्या २२ विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील ९५ शाळा व महाविद्यालयातील ३४ हजार ५०० विद्यार्थ्यांना १४४ सादरीकरणाद्वारे सायबर सुरक्षेबद्दल जागरुक केले. या २२ विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनकडून विद्यावेतनही देण्यात आले. नान्नज ग्रामपंचायत व माऊली कॉलेज, वडाळा येथेही सायबर सुरक्षिततेबाबत साक्षरता निर्माण केली. कांचन निकंबे, सई अवताडे, रत्नप्रभा चंदनशिवे, ऋतुजा वाघमोडे, प्रवीण कोळी, सिध्दारामय्या स्वामी, मोहीनी दुधाळ, राहुल शिंदे, स्वप्नाली जाधव, वैष्णवी पाटील, रिध्दी खोकले, प्राजक्ता सरवदे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर उपक्रम राबविण्याकामी कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांचे मार्गदर्शन तर क्विक हिल फाउंडेशनचे अजय शिर्के, सुगंधा दानी, गायत्री केसकर, डॉ.अशोक शिंदे, डॉ.श्रीराम राऊत यांचे सहकार्य लाभले.



Solapur Edition
Jan 20, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com